05-03-2025-Dai-04_DH_PAN_20_08_2016-3.qxp 03/05/2025 12:27 AM Page 1



## निवडक



मांद्रे : विज्ञान स्पर्धेत यश मिळवलेल्या खलप हायस्कूलचे विद्यार्थी. सोबत मुख्याध्यापक शरद गावडे, शिक्षक कृष्णा डफले व वर्धा तळकर.

### मांद्रे खलप हायस्कूलला विज्ञान स्पर्धेत यश

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. ४ :** मोरजी विद्याप्रसारक हायस्कूल आणि गोवा राज्य विज्ञान व तंत्रज्ञान परिषद, बार्देशच्यावतीने आयोजित विज्ञान दिन कार्यक्रमात मांद्रेतील रमाकांत द. खलप हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी तीन बक्षीसे पटकावली. विज्ञान मॉडेल तयार करण्याच्या स्पर्धेत अनुष्का नाचणेकर आणि सोनिया सातोस्कर (इ.७) यांनी पहिले उत्तेजनार्थ, निबंध लेखन स्पर्धेत स्वरांगी गावडे (इ.८) हिला पहिले उत्तेजनार्थ आणि विज्ञान प्रश्नमंजुषा स्पर्धेत शमिका आश्वेकर (इ.८) हिने पहिले उत्तेजनार्थ पारितोषिक पटकावले. विद्यार्थ्यांना शिक्षिका वर्धा तळकर, शिक्षक कृष्णा डफले आणि कला शिक्षक दीप राज फडते यांचे मार्गदर्शन लाभले. मुख्याध्यापक श्री शरद गावडे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. संस्थेचे अध्यक्ष ड. रमाकांत खलप, शाळा व्यवस्थापन समिती आणि पालकांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

---



इब्रामपूर : विद्यार्थ्यांसोबत शिक्षकवर्ग.

### सातेरी विद्या मंदिर इब्रामपूर येथे विज्ञान दिन उत्साहात

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. ४ :** इब्रामपूर पेडणे येथील सातेरी विद्या मंदिर विद्यालयात विज्ञान दिन मोठ्या उत्साहात साजरा झाला या दिनाचे औचित्य साधून डॉ. सी. व्हीरमन यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन अमिता नाईक (उद्योजिका) यांच्या हस्ते करण्यात आले. विज्ञान संबंधित उत्साह निर्माण व्हावा यासाठी भित्तीपत्रक स्पर्धा, रांगोळी स्पर्धा स्टोन पेंटिन, फेस पेंटिंग, प्रश्नमंजूषा, मेहंदी स्पर्धा, लेख्यान वैज्ञानिक प्रयोग स्पर्धा इठक घेण्यात आल्या. सूर्व स्पर्धाचा विषय विज्ञान हाच होता. या विविध स्पधमिध्ये इयला ५ वी ते रवी च्या मुलांनी उत्स्फुर्तपणे भाग घेतला. विजेत्याना वहितसे देऊन गौरवण्यात आले. कार्यक्रमासअमिता नाईक या प्रमुख पाछुट्या म्हणून उपस्थित होत्या. यावेळी आपल्या भाषणात बोलताना त्या म्हणाल्या आज कृषीक्षेत्रातही तंत्रज्ञानाने तंत्रज्ञानाने बऱ्यापैकी प्रगती केली आहे. मुलांनीही वैज्ञानिक दृष्टीको वालून विवार ककन आपने जीवन समृद्ध बनवावे: शाळेचे अध्यक्ष श्री श्राविस हे सुद्धा विज्ञान दिनाच्या उपस्थित होते. कार्यक्रमाला उपि कविता चौकेकर यांनी विधार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन विज्ञान शिक्षिका सुरेखा राऊळ यांनी केले.

---



### आमोणकर विद्यामंदिराचा बाजार दिन उत्साहात

■ टीम दैनिक हेराल्ड

**म्हापसा, दि. ४ :** जी. एस् .आमोणकर विद्यामंदिराच्या प्राथमिक विभागातर्फे शनिवारी १ मार्च रोजी शाळेच्या पटांगणात बाजारदिन उपक्रमाचे आयोजन केले होते. या उपक्रमाचे उद्घाटन शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. पूजा दळवी यांच्या हस्ते झाले. मुख्याध्यापिकांनी या उपक्रमाबद्दल विद्यार्थी व पालकांचे कौतुक केले. मुलांना खरेदी- विक्री, जमा-खर्च याची माहिती व्हावी म्हणून अशा उपक्रमांचे आयोजन करणे गरजेचे आहे असे विचार या कार्यक्रमात मांडण्यात आले. पालक शिक्षक संघाचे अध्यक्ष,उपाध्यक्ष तसेच इतर सर्व सभासदही यावेळी उपस्थित होते.यात विद्यार्थ्यांनी भाजी, फळे, खाण्याचे पदार्थ, झाडे, शालेय साहित्य असे विविध प्रकार विक्रीसाठी मांडले होते. यानिमित्त इयत्ता ३री व ४थीच्या विद्यार्थ्यांनी मराठी पाठ्यपुस्कातील फणसाच्या झाडापासून तसेच नारळाच्या झाडापासून तयार केलेल्या हस्तकलेचे प्रदर्शन मांडण्यात आले होते.पालक तसेच माजी विद्यार्थ्यांच्या भरघोस प्रतिसादामुळे विद्यार्थ्यांनी खरेदी विक्रीचा आनंद लुटला.

---



कोरगाव : दशावतारी नाटकात बालकलाकार.

### कमलेश्वर हायस्कूलने सादर केलेले दशावतारी नाट्य प्रयोग

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. ४ :** कोरगाव पेठेचावाडा येथील कमलेश्वर हायस्कूलने स्नेहसंमेलनात सादर केलेल्या दशावतारी नाटकाला रेडी येथे शिवरात्रोत्सवात सादर करण्याची मागणी आल्या नंतर त्यांनी ते सादर करून रसिक प्रेक्षकाकडून बालकलकरांची वाहवा झाली.आता या दशावतारी नाटकाला ओटवणे (सावंतवाडी), मंडकुली (कुडाळ), कुचेली (म्हापसा) आणि कोरगांव येथे प्रयोगासाठी मागणी आली आहे. शिक्षक दयानंद वेंगुर्लेकर यांनी लिहिलेले हे दशावतारी नाटक श्री कमलेश्वर हायस्कूल पेठेचावाडाच्या विद्यार्थ्यानी आपल्या वार्षिक स्नेहसंमेलनात सादर केले होते. ते नाटक त्यांनी यू ट्यूब वर सादर केले होते ते नाटक पहिल्या नंतर या नाटकाला रेडी येथील शिवरात्री उत्सवात सादर केले. मांढरा देवी काळूबाई या नाटकात श्री कमलेश्वर हायस्कूलच्या संकेत जोशी (देवी लाख्यासूर), अन्वेत पालयेकर (नारद), अथर्व नलेकर (शंकर), दत्तराम रीगणेकर (पार्वती), नैतिक भाईडकर (गजरा), मंथन शेट्ये (शेट्ये), लक्ष्मण शेट्ये (मांद्यव्य ऋषी)स यश शेट्ये (कालभैरव), कृष्णा कुडतरकर (देवी मांढरा देवी) यांनी भाग घेतला होता. या नाटकाचे लेखन शिक्षक दयानंद वेंगुर्लेकर यांनी केले आहे. नववीच्या पाठ्यपुस्तकातील दशावतारचे दर्शन हा पाठ केंद्रस्थानी ठेवून मुलामध्ये दशावतारी नाटकाची गोडी निर्माण व्हावी यासाठी हे नाटक सादर करण्यात आले आहे.

# टीम इंडियाची फायनलमध्ये धडक

## उपांत्य फेरीत ऑस्ट्रेलियावर दणदणीत विजय : विराट कोहलीची शानदार अर्धशतकी खेळी



दुबई, दि. ४ : विराट कोहलीच्या (८४) शानदार अर्धशतकाच्या जोरावर आणि राहुलच्या लगावलेल्या विजयी षटकारासह भारताने ऑस्ट्रेलियाकडून आयसीसी स्पर्धांच्या पराभवाचा बदला घेत दणदणीत विजय नोंदवला. या विजयासह भारताने चॅम्पियन्स ट्रॉफीच्या फायनलमध्ये दिमाखात प्रवेश केला. उपांत्य फेरीसाठी झालेल्या आजच्या सामन्यात ऑस्ट्रेलियाने भारतासमोर २६५ धावांचे लक्ष्य दिले होते. भारतीय संघाने ऑस्ट्रेलियाचा ५ विकेट राखून गाठले. टीम इंडियाच्या विजयाचे हिरो मोहम्मद शमी आणि विराट कोहली ठरले. तर विराट कोहली सामन्याचा सामनावीर ठरला.

ऑस्ट्रेलियाच्या २६५ धावांचा पाठलाग करताना भारताला रोहित शर्माने धडाकेबाज सुरुवात करून दिली. पण रोहितला यावेळी पुन्हा एकदा मोठी खेळी साकारता आली नाही. रोहित यावेळी २८ धावा करू शकला. शुभमन गिल या सामन्यात अपयशी ठरला आणि त्याला आठ धावांवर समाधान मानावे लागले. भारताने दोन्ही सलामीवीर गमावले असले तरी विराट कोहलीने ययावेळी श्रेयस अय्यरच्या साथीने भारताचा डाव सावरला. या दोघांनी तिसऱ्या विकेटसाठी ९१ धावांची भागीदारी रचली. ही जोडी मोठी धावसंख्या उभारेल, असे वाटत होते. पण त्यावेळी श्रेयस अय्यर हा ४५ धावांवर बाद झाला आणि ही जोडी फुटली. पण त्यानंतर विराट कोहलीने धावांचा ओघ सुरुच ठेवला. कोहलीने आपले अर्धशतक साकारले आणि त्यानंतर त्याने धावांचा ओघ वाढवला. विराटने अर्धशतकानंतरही आपला आक्रमकपणा सोडला नाही. चुकीच्या चेंडूवर तो चौकार वसूल करत होता. यावेळी विराटने अक्षर पटेलला आपल्या साथीला घेतले आणि विजयाची वीटा रचायला त्याने पुन्हा सुरुवात केली. अक्षर बाद झाल्यावर लोकेश राहुलच्या साथीने विराटने पुन्हा धावा जमवायला सुरुवात केली. पण या प्रयत्नामध्ये विराट कोहलीचे शतक हुकले. विराट कोहली पाच चौकारांसह ९८ चेंडूत ८४ धावा करत बाद झाला. अक्षरने २७ धावांची खेळी केली. तर हार्दिकने अखेरच्या षटकांमध्ये शानदार ३ षटकार आणि एक चौकार लगावत संघाचा विजय सोपा केला आणि २८ धावांची खेळी करत बाद झाला. तर केएल राहुल ४२ धावा करत नाबाद परतला.

तत्पूर्वी, ऑस्ट्रेलियाने नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. कांगारू संघाकडून कर्णधार स्टीव्ह स्मिथ आणि ॲलेक्स कॅरी वगळता इतर कोणत्याही फलंदाजाला मोठी खेळी करता आला नाही. स्टीव्ह स्मिथने ९६ चेंडूत ७३ धावांची खेळी केली, तर लेक्स कॅरीनेही ५७ चेंडूत ६१ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. भारताच्या गोलंदाजांनी कायम भारताला सामन्यात ठेवत संघाच्या विजयाच्या पाया रचला. उर्वरित फलंदाजांपैकी एकाही फलंदाजाला ५० धावांचा टप्पा ओलांडता आला नाही. याचे कारण भारतीय गोलंदाजांनी चांगली गोलंदाजी केली. मोहम्मद शमीने १० षटकांत ४८ धावांत तीन विकेट घेतले, तर वरुण चक्रवर्ती आणि रवींद्र जडेजाने प्रत्येकी दोन विकेट घेतले. हार्दिक पंड्या आणि अक्षर पटेल यांना प्रत्येकी एक विकेट मिळाली. कुलदीप यादव हा एकमेव गोलंदाज होता ज्याला एकही विकेट मिळाली नाही.

वर्ल्ड कप २०११ च्या उपांत्यपूर्व फेरीत टीम इंडियाने ऑस्ट्रेलियाचा पराभव करून उपांत्य फेरीत धडक मारली आणि त्यानंतर विजेतेपदही पटकावले होते. यावेळी टीम इंडिया जेतेपदाच्या जवळ आली आहे आणि उपांत्य फेरीत ऑस्ट्रेलियाला नमवत स्पर्धेतून बाहेर काढले. यासह टीम इंडियाने सलग तिसऱ्यांदा (याआधी २०१३ आणि २०१७ मध्ये) या स्पर्धेच्या अंतिम फेरीत स्थान मिळवून हॅट्ट्रिक साधली.

### रोहित शर्माने मोडला ख्रिस गेलचा वर्ल्ड रेकॉर्ड

**रोहित शर्मा आता आयसीसी वनडे स्पर्धेत सर्वाधिक षटकार लगावणारा फलंदाज बनला आहे. आतापर्यंत वेस्ट इंडिजचा स्फोटक फलंदाज ख्रिस गेल पहिल्या स्थानी कायम होता, पण रोहित त्याच्याही पुढे गेला आहे. आयसीसी एकदिवसीय स्पर्धेत म्हणजेच एकदिवसीय विश्वचषक आणि चॅम्पियन्स ट्रॉफीचा यात समावेश आहे, या दोन्ही स्पर्धा ५० षटकांमध्ये खेळवल्या जातात. रोहित शर्माने आता आयसीसी वनडे स्पर्धेत ६५ षटकार पूर्ण केले आहेत. ख्रिस गेल ६४ षटकारांसह दुसऱ्या क्रमांकावर आहे.**

### कोहली सर्वाधिक झेल घेणारा खेळाडू

**विराट कोहलीने दुबईच्या मैदानावर फलंदाजी न करताही इतिहास घडवला आहे. विराट आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये भारताकडून सर्वाधिक झेल घेणारा खेळाडू बनला आहे. त्याने राहुल द्रविडचा विक्रम मोडीत काढला आहे. रवींद्र जडेजाच्या चेंडूवर जोश इंग्लिसचा झेल घेत विराटने ही कामगिरी केली. टीम इंडियाच्या स्टार फलंदाजाने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये आतापर्यंत ३३६ झेल घेतले आहेत.**

---

# अजिंक्य रहाणे कोलकाता नाईट रायडर्सचा नवा कर्णधार

मुंबई, दि. ३ :

कोलकाता नाईट रायडर्स संघाने नव्या हंगामासाठी अनुभवी अजिंक्य रहाणेची नियुक्ती केली आहे. वेंकटेश अय्यर उपकर्णधार म्हणून काम पाहील. केकेआर संघाचे मुख्य कार्यकारी अधिकारी वेंकी म्हैसूर यांनी सांगितलं की, अजिंक्यचा अनुभव संघासाठी अत्यंत मोलाचा असेल. त्याचं नेतृत्व कौशल्य सगळ्यांनाच ठाऊक आहे. अजिंक्यच्या नेतृत्वात आम्ही जेतेपद कायम राखू'.

नव्या जबाबदारीसंदर्भात बोलताना अजिंक्य म्हणाला, कोलकाता नाईट रायडर्स संघाचं नेतृत्व करणं हा माझ्यासाठी मोठा सन्मान आहे. आमच्याकडे अतिशय संतुलित असा संघ आहे. जेतेपद राखण्यासाठी आम्ही तयारी सुरू केली आहे'.



कोलकाता नाईट रायडर्स यंदाच्या हंगामाच्या सुरुवात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूविरुद्धच्या लढतीने करणार आहे. २२ मार्चला कोलकाता इथे इडन गार्डन्स मैदानावर हा मुकाबला होणार आहे.

कोलकाता नाईट रायडर्स संघाने २०१२, २०१४ आणि २०२४ मध्ये आयपीएल जेतेपदावर नाव कोरलं होतं. गेल्या हंगामात श्रेयस अय्यरच्या नेतृत्वात कोलकाता नाईट रायडर्स संघाने जेतेपदाची कमाई केली होती. श्रेयसच कोलकाताचा कर्णधार असेल अशी चिन्हं होती मात्र लिलावापूर्वी श्रेयस कोलकाताचा भाग नसणार हे स्पष्ट झालं. लिलावात पंजाब किंग्ज संघाने श्रेयसला ताफ्यात दाखल केलं.

महिनाभरापूर्वी झालेल्या लिलावात सुरुवातीच्या टप्प्यात अजिंक्य रहाणे अनसोल्ड गेला होता. दहापैकी एकाही संघाने त्याला संघात घेण्यात स्वारस्य दाखवलं नाही. लिलावाच्या पुढच्या टप्प्यात कोलकाता संघाने अजिंक्यला त्याच्या बेस प्राईजला अर्थात १.५० कोटी रुपये देऊन संघात समाविष्ट केलं. याच लिलावात कोलकाता संघाने अष्टपैलू वेंकटेश अय्यरसाठी तब्बल २३.७५ कोटींची बोली लावली. अनेक संघ वेंकटेशला ताफ्यात सामील करुन घेण्यासाठी आतूर होते पण कोलकाताने निश्चय ढळू न देता प्रचंड पैसे खर्चून वेंकटेशला पुन्हा संघात सामील केलं. वेंकटेशसाठी कोलकाताचा निर्धार पाहता तो भावी कर्णधार असू शकतो असं संकेत मिळत होते.

# मडगाव रॉयल्स अंतिम फेरीत

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. ४ :** मडगाव रॉयल्सने प्रायॉरिटी टायटन्सचा एलिमिनेटर २' लढतीत १०६ धावांनी पराभव करत आल्कॉन जीएसबी युनिटी कप टी-२० क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रवेश केला. प्रायॉरिटी टायटन्सने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचे निमंत्रण दिल्यानंतर मडगाव रॉयल्सने ८ बाद २४४ अशी विशाल धावसंख्या उभारली. यानंतर त्यांनी प्रायॉरिटी टायटन्सचा डाव १५ षटकांत १३८ धावांत गुंडाळला. गोवा जीएसबी स्पोर्टस् अँड चॅरिटेबल ट्रस्टने गोवा सारस्वत समाज यांच्या सहकार्याने आयोजित या स्पर्धेतील सामने मडगावच्या एमसीसी मैदानावर खेळविले जात आहेत. ८ मार्च रोजी होणाऱ्या अंतिम सामन्यात त्यांना सीडी मडगाव मेगा स्ट्रायकर्स संघाशी दोन हात करावे लागणार आहेत. मडगाव रॉयल्सचा संप्रभ फळदेसाई मॅन ऑफ द मॅच ठरला.

संक्षिप्त धावफलक – मडगाव रॉयल्स – २० षटकांत ८ बाद २४४ (ग्रांथिक बुयांव ४०, दामोदर पै पाटणेकर ३८, आदित्य दलाल ३७, अर्श सरदेसाई ३५, विक्रम गायतोंडे ३१, सिद्धार्थ घाणेकर ४३-१, मनीष काकोडे ६०-१, स्मितेश दिवेकर २९-१, प्रणव बिचे ३१-१) विजयी वि. प्रायॉरिटी टायटन्स – १५ षटकांत सर्वबाद १३८ (अनीश महांबरे ३५, गौरीश प्रभुदेसाई २१, संप्रभ फळदेसाई ३६-३, शौनित सावर्डेकर १३-२, अर्श सरदेसाई ३-१, सनत प्रभुदेसाई ४-१, कार्तिक हट्टंगडी २४-१)




मडगाव : संप्रभ फळदेसाईला मॅन ऑफ द मॅच व ग्रांथिक बुयांवला हिरो ऑफ द मॅच पुरस्कार देताना मांगिरीष सालेलकर व आशिष दुकळे. सोबत सिध्दित रायतुरकर.

---

# क्रिकेट स्पर्धेत पुरुष संघ दामबाब दख, महिला संघ दक्षिण वॉरियर्स विजेते

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. ४ :**अखिल गोमंतकीय दैवज्ञ ब्राम्हण युवा संघाने आपली सातवी दैवज्ञ क्रिकेट चषक स्पर्धा नुकतीच एस.ए.जी मैदान, फातोर्डा येथे पार पडली. या दोन दिवसीय क्रिकेट स्पर्धेच्या समारोप समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून मेडिकल प्रेक्टिशनर ॲण्ड निवृत्त लेफ्टनंट कर्नल (निवृत्त) विनोद ज्ञानेश्वर साळकर, संगीतकार मुकेश घाटवळ उपस्थित होते.

यावेळी सिमरन हळदणकर यांना दक्षिण आशिया कराटे चॅम्पियनशीप २०२४ मध्ये कांस्यपदक मिळाल्याबद्दल गौरव करण्यात आला.

या स्पर्धेत संपूर्ण गोव्यातून एकूण १४ संघासह २ महिला संघानेही सहभाग घेतला होता. अखिल गोमंतकीय दैवज्ञ ब्राह्मण असोसिएशन यांचे नवनिर्वाचित अध्यक्ष सीमा वेर्णेकर यांनी पाहुण्यांचे आणि इतर मान्यवरांचे स्वागत केले. असोसिएशनने वर्षभरात केलेले सर्व कार्यक्रम, उपक्रम आणि इतर समाजसेवेची माहिती दिली. लेफ्टनंट कर्नल (निवृत्त) विनोद साळकर यांनी अखिल गोमंतकीय दैवज्ञ ब्राम्हण संस्थेने अशा प्रकारचे उपक्रम राबविलेल्याबद्दल त्यांचे कौतुक केले आणि अशा कार्यव माला आमंत्रित केल्याबद्दल असोसिएशनचे आभार प्रकट केले. विजेत्या संघासह उपविजेत्या संघाला आणि इतर व्यक्तींना उपस्थित मान्यवरांतर्फे चषक प्रदान करण्यात आले. या भव्य कार्यक्रमात ३०० हून अधिक लोक उपस्थित होते.




विजेत्यांची नावे पुढीलप्रमाणे :

पुरुष विजेता संघ – दामबाब दख, उपविजेता –डायनॅमिक क्रिकेटर्स, मालिकावीर – आयुष वेर्लेकर, सर्वोत्कृष्ट फलंदाज – अमृत वेर्लेकर, सर्वोत्कृष्ट गोलंदाज – दीप्तेश हळदणकर, अंतिम फेरीचा सामनावीर – यश कासवणकर, सर्वोत्तम झेल-मिथील कारेकर, जास्तीत जास्त षटकार- आयुष वेर्लेकर, सर्वोत्कृष्ट आगामी खेळाडू – यश कासवणकर, महिला विजेता संघ – दक्षिण वॉरियर्स, महिला उपविजेता संघ- बार्देश रिगल्स, महिला सामनावीर – स्नेहल वाळके यांना प्रदान करण्यात आले.

वैभवी बांदोडकर व विशाल वेर्णकर यांनी सूत्रसंचालन केले. अखिल गोमंतकीय दैवज्ञ ब्राम्हण यांचे साहिल लोटलीकर यांनी आभार मानले.

# 'डिचोलीत आध्यात्मिक पर्यटनाला मिळणार मोठी चालना'

■ टीम दैनिक हेराल्डड

▶ **वल्लभ साळकर यांचा भतग्राम भूषण पुरस्काराने सन्मान**

**डिचोली, दि. ४ :** गोवा म्हणजे केवळ समुद्रकिनारे खाव पिवो मजा करणे नसून नव्या प्रयत्न धोरणनुसार ग्रामीण पर्यटन, संस्कृतिक अध्यात्मिक पर्यटनच्या माध्यमातून जागतिक पर्यटकांना ग्रामीण गोव्याचा खरा निसर्ग दाखवण्यासाठी आकर्षित करण्यासाठी पर्यटन खाते वेगवेगळे उपक्रम राबवत, असून मुख्यमंत्र्यांच्या सहकार्याने या कार्याला आम्ही सुरुवात केलेली आहे.

डिचोली तालुका हा ऐतिहासिक तालुका असून छत्रपती शिवाजीराजांच्या पदस्पर्शाने पूनीत झालेल्या या तालुक्यात अध्यात्मिक पर्यटनाला चालना देताना नार्वे येथे पंचगंगेच्या तीरावर गोमंत सरीता धार्मिक पर्यटन केंद्र तसेच हरवळे येथे १७ कोटी रुपये खर्च आधुनिक सुविधा बहाल करण्याची योजना असल्याचे प्रतिपादन पर्यटन मंत्री रोहन खवटे यांनी डिचोली येथे केले.

डिचोली बचाव अभियान आयोजित भत ग्राम महोत्सवात डिचोलीतील ज्येष्ठ नागरिक व समाजसेवक श्रीवल्लभ साळकर यांना यंदाचा प्रतिष्ठेचा भतग्राम भूषण पुरस्कार देऊन रोहन खंवटे याच्या हस्ते शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह व मानपत्र देऊन सन्मानीत करण्यात आले. यावेळी माजी मुख्यमंत्री लक्ष्मीकांत पार्सेकर, माजी सभापती राजेश पाटणेकर, अध्यक्ष नरेश सावळ आदींच्या उपस्थितीत हा गौरवकरण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराज मैदानावर आयोजित करण्यात आलेल्या गौरव सोहळ्यास व्यासपीठावर साखळीच्या नगराध्यक्ष सिद्धी प्रभू, नरेश कडकडे, सुशांत पेडणेकर, डिचोली पालिकेचे नगरसेवक सरपंच पंचायत सदस्य तसेच इतर मान्यवर उपस्थित होते.

सभापती राजेश पाटणेकर वल्लभ साळकर यांनाभत ग्रामभूषण प्रदान करून योग्य व्यक्तीचा योग्य सन्मान केल्याचे स्पष्ट केले. यावेळी विविध क्षेत्रात आपले कर्तृत्व दाखवलेल्या अनेक मान्यवरांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

अध्यक्ष नरेश सावळे यांनी भत ग्राम महोत्सव हा डिचोली वासियांचा जिवाभावाचा उत्सव बनलेला असून यापुढे अधिक जोमाने डिचोलीतच नव्हे तर गोव्याच्या विविध भागात हा उत्सव गणला जावा यासाठी आमचे विशेष प्रयत्न कायम असतील.राजकारणाच्या पलीकडे जाऊन एका कर्तुत्ववान समाजसेवकाला भत्ताग्राम भूषण देण्याचा मान मिळाला याचे भाग्य असल्याचे नरेश सावळे म्हणाले. नरेश कडकडे यांनी मान पत्राचे वाचन केले. सूत्रसंचालन प्रांजल मराठे निशांत चणेकर यांनी केले. महेश्वर परब यांनी आभार मानले.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक १८१ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 181 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .